प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.३ विजया अशोक तुंगारे यांचे वारसांना प्रतिवादी म्हणून सामील करुन घेणेकरीता दाखल केलेला आहे.

**२.** वादी यांच्या कथनाप्रमाणे, दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.३ विजया अशोक तुंगारे या दि.२८.०६.२०२० रोजी झालेल्या आहेत. मयत विजया अशोक तुंगारे यांना अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे नजीकचे व कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांना दाव्याचे कामी मयत प्रतिवादी क्र.३ विजया अशोक तुंगारे यांचे वारस म्हणून सामील करुन तशी दुरुस्ती करणेची परवानगी मिळावी. सबब अर्ज.

**३.** प्रतिवादी क्र.११ ते १४ यांनी निशाणी क्र.११८ कडे प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन तिव्र आक्षेप नोंदविला आहे. त्यांचे कथनाप्रमाणे, वादीची अर्जातील सर्व कथने खोटी व खोडसाळ असून, प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाहीत. वादींनी त्यांच्या आजारपणाबाबतचा कोणताही वैद्यकिय दाखला व विलंबाबाबतचे संयुक्तीक कारण नमूद करुन त्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयात हजर केलेला नाही. अर्ज कायद्याने चालणारा नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करुन तो खर्चासह फेटाळण्यात यावा. इतर प्रतिवादींनी सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे अर्ज त्यांचे म्हणणे विना विचारात घेण्यात येत आहे.

**४.** दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले.

**५.** प्रस्तुतचा दावा हा धडेवाटप होऊन मिळणेकरीता दाखल आहे. प्रतिवादी क्र.३ या दि.२८.०६.२०२० रोजी मयत झालेल्या आहेत. तेव्हापासून ९० दिवसांच्या कायदीय कालावधीमध्ये त्यांचे वारस अभिलेखावर आणलेले नाहीत. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या सदर प्रतिवादीविरुध्द दावा उपशमित झाला आहे. त्यानंतर दावा उपशमन रद्द होणेसाठी देखील

६० दिवसांच्या विहीत मुदतीमध्ये अर्ज दाखल नाही व त्यामध्ये विलंब झालेला आहे. त्याअनुषंगाने दाखल झालेला विलंब माफीचा आणि उपशमन (Abatement) रद्द होणेसाठीचा अर्ज आजरोजी गुणदोषावर मंजुर झालेले आहेत. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठ्यर्थ वादीने त्याचे शपथपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. तसेच, प्रतिवादी क्र.११ ते १४ यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये प्रतिवादी क्र.३ विजया अशोक तुंगारे या दि.२८.०६.२०२० रोजी मयत झाल्याचे नाकारलेले नाही. तसेच दाव्याचे स्वरुप विचारात घेता, सदर वारसांविरुध्द दावा चालविण्याचा अधिकार (Right to sue) आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २२, नियम ४ अन्वये सदर वारस अभिलेखावर येणे गरजेचे आहे. सबब, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

१. निशाणी क्र.११५ वरील आदेशास अधिन राहून अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दाव्याच्या सरनाम्यामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत अभिलेखावर दाखल करावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

SHIVAJI PANDURANG PATIL

Digitally signed by SHIVAJI PANDURANG PATIL
Date: 2026.07.03 17:31:36 +0530

दिनांकः –०३/०७/२०२६ (एस.पी.पाटील)

ठिकाणः– सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी